# प्रेसनोट

नाशिक,
दि. ०६/०३/२०२३

**आलोसे अनिल बाबुराव आगीवले ,वाहन चालक, तहसिल कार्यालय, त्रंबकेश्वर, जि.नाशिक संलग्न- उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्रंबकेश्वर जि.नाशिक यांनी १,५०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक | नाशिक |
| गुन्हा नोंद कमांक | मुंबई नाका पोलीस ठाणे, नाशिक शहर येथे गु.र.नं ७५/२०२३ दि.५.३.२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७,७ अ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | आलोसे अनिल बाबुराव आगीवले ,वाहन चालक, तहसिल कार्यालय, त्रंबकेश्वर, जि. नाशिक संलग्न- उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्रंबकेश्वर जि.नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,००,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १,५०,०००/- रूपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी मौजे शिरसाठे ता.इगतपुरी येथील जमीन खरेदी करीता श्री. गांगुर्डे यांचे कडुन विसार पावती देवुन केलेल्या नोटरीवर तत्कालीन उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्रंबकेश्वर जि.नाशिक येथे दाखल दाव्याचा निकाल श्री.गांगुर्डे यांचे लाभात म्हणजेच तक्रारदार यांचे बाजुने लावुन दिल्याचे मोबदल्यात उपविभागीय अधिकारी श्री. चव्हाण यांना देण्यासाठी व स्वत:साठी २,००,०००/- रू लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आलोसे अनिल बाबुराव आगीवले ,वाहन चालक, तहसिल कार्यालय, त्रंबकेश्वर, जि.नाशिक संलग्न- उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्रंबकेश्वर जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचे कडे २,००,०००/- रूपये लाचेची मागणी करून त्यापैकी १,५०,०००/- रूपये लाचेची रक्कम दि. ४.३.२०२३ रोजी अनंत कान्हेरे मैदान व शासकीय विश्रामगृह यांचे मध्ये असलेल्या रोडवर स्विकारल्याने त्यांना पकडण्यात आले असून त्यांचेविरुध्द मुंबई नाका पोलीस ठाणे, नाशिक शहर येथे गु.र.नं ७५/२०२३, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७,७ अ प्रमाणे दि. ५. ३.२०२३ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| संपर्क पत्ता | :- | ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक |
| संकेतस्थळ | :- | acbmaharashtra.gov.in |
| ई-मेल | :- | spacbnashik@mahapolice.gov.in |
| ऑनलाईन तक्रार | :- | acbmaharashtra.net |
| टोल फ्री कमांक | :- | १०६४ |
| दुरध्वनी कमांक | :- | ०२५३-२५७५६२८, २५७८२३० |
| व्हॉट्स ॲपक | :- | ९९३०९९७७०० |

पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक परिक्षेत्र, नाशिक

(नरेंद्र भा. पवार)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबधक विभाग, नाशिक